# मुंबई येथील नायगांव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्प

- **टप्पा क्र. १ अंतर्गत** चाळ क्र. १ब, २ब, ३ब, ४ब, ५ब, ६ब, ७ब, ८ब, ११ब, १२ब, १३ब, १४ब, १५ब, १६ब, १७ब, १८ब, १९ब, २०ब, २१ब, २२ब व २३ब **(एकूण २१ चाळी) चाळीतील रहिवाशांनी संक्रमण शिबिर / भाडेपर्याय निवडून गाळे रिक्त केलेल्या चाळी पाडण्यात आल्या आहेत.** पाडण्यात आलेल्या चाळ क्र. १२ब ते चाळ क्र. २२ब या चाळींच्या मोकळ्या जागेवर **पुनर्वसन इमारत क्र. १** मधील एकूण ८ टॉवरचे जोत्यावरील बांधकाम प्रगतीपथावर आहे. यातील टॉवर क्र. ४, ५, ६, ७ व ८ या ५ टॉवरचे संरचनात्मक बांधकाम पुर्ण झाले असून अंतर्गत फिनिशिंगचे काम नियोजित वेळापत्रकानुसार प्रगतीपथावर आहे. या ८ टॉवरच्या जोत्यावरील एकूण १८८ मजल्याच्या संरचनात्मक (RCC) बांधकामापैकी १६१ मजल्याचे काम पुर्ण झाले आहे.
- **टप्पा क्र. १ अंतर्गत** तोडण्यात आलेल्या चाळ क्र. १ बी, २बी, ३बी, ४बी, ५बी, ६बी, ७बी व ८बी च्या जागेवर **विक्री घटकाच्या निवासी इमारतीच्या** बांधकामपूर्व शोअर पाईलिंगचे काम प्रगतीपथावर असून एकूण ५७४ पैकी जागेवरील उपलब्ध व्याप्तीनुसर ३४० शोअर पाईलपैकी ३१५ शोअर पाईलचे काम पूर्ण झाले आहे. तसेच एकूण उपलब्ध व्याप्ती १,८१,४००cum खोदकामापैकी ६५,०००cum खोदकाम पूर्ण झाले आहे.
- पुनर्विकासाच्या पहिल्या टप्प्यातील एकूण १४०१ पुनर्वसन सदनिकांपैकी ८६४ पुनर्वसन सदनिकांचे बांधकाम सप्टेंबर-२०२५ पर्यंत तर उर्वरित ५३७ पुनर्वसन सदनिकांचे बांधकाम डिसेंबर - २०२५ पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजित आहे.
- **टप्पा क्र. २ अंतर्गत** प्रस्तावित **पुनर्वसन इमारत क्र. २** मधील एकूण १२ पुनर्वसन टॉवरपैकी ३ पुनर्वसन टॉवरच्या जागेवरील ८अ ते १२अ अशा ५ चाळी रिक्त करण्यात आल्या असून अशा ५ चाळीमधील रहिवाशांनी भाडेपर्याय निवडून पुनर्विकासासाठी गाळे रिक्त करून म्हाडास हस्तांतरीत केले आहेत व या ५ रिक्त चाळींपैकी २ चाळी पाडण्यात आल्या असून उर्वरित ३ चाळींचे पाडकाम करण्यात येत आहे.